॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. ३ (            ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात महाविद्यालये व विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळांच्या प्रस्तावित शुल्कासंदर्भात चर्चा करण्यासाठी दि.८ मे रोजी विविध विद्यार्थी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांसमवेत बैठक आयोजित करण्यात आली आहे.

सोलापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरु प्रा.एन.एन.मालदार यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठ कायदयातील कलम १०१ (३) अन्वये शुल्क निश्‍चिती समिती गठित केली आहे. या समितीने गेल्या वर्षभरात वेळोवेळी बैठका घेवून महाविद्यालये व विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा/विभाग यांच्यासाठी विविध शुल्क प्रस्तावित केले आहे. या शुल्काची अंमलबजावणी करण्यापूर्वी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विद्यार्थी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांसोबत चर्चा करुन त्यांच्या विधायक सुचनांचा विचार करावा असे समितीने सुचविले आहे. त्यानुसार विविध विद्यार्थी संघटनांच्या प्रत्येकी दोन पदाधिकाऱ्यांची बैठक बुधवार, दि. ८ मे रोजी दुपारी २ वाजता विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. विविध संघटनांना यासंदर्भात विद्यापीठाकडून कळविण्यात येत आहे, अशी माहिती उपकुलसचिव अ.चि.मनोरे यांनी दिली.

---

जा.क्र: कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांक : ३ मे, २०१९

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,<br>
स्वाक्षरीत प्रत/-<br>
( डॉ.सुनील पाटील )<br>
जनसंपर्क अधिकारी